# बृहन्मुंबई महानगरपालिका

## (अनुज्ञापन अतिक्रमण निर्मूलन खाते, एम/पूर्व विभाग)

क्रमांक सआ/एम-पूर्व/ओडी/३४५/अति.निर्मू. दिनांक 16/11/२०२३

**स्वारस्य अभिव्यक्ती**

**जाहिरात**

**विषयः-** एम/पूर्व विभागामध्ये अतिक्रमण निर्मूलन वाहनावर अशासकीय संस्थेकडून दि. 01.12.2023 ते 31.03.2024 पर्यंत कामगार घेण्याबाबत. .

एम/पूर्व विभागामध्ये अतिक्रमण निर्मूलन वाहनावर कामगार घेण्याबाबत एका अशासकीय संस्थेची निवड करण्यात येणार आहे. सदर वाहनावर कामगार पुरवठा करण्याचा अनुभव असणाऱ्या किंवा महानगरपालिकेच्या इतर विभागामध्ये कामगार पुरवठा केल्याचा अनुभव असणा-या एम/पूर्व विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नोंदणीकृत असणा-या इच्छुक स्थानिक नोंदणीकृत अशासकीय संस्था, नोंदणीकृत मजूर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, रोजगार सेवा सहकारी संस्था, औदयोगिक सेवा सहकारी संस्था इत्यादी संस्थाकडून अर्ज मागवण्यिात येत आहेत. संस्थेची पात्रता यादी तयार करुन सोडत पध्दतीने निवड करण्यात येईल. निवड झालेल्या संस्थेकडून प्रति दिन सकाळी ०८.०० ते रात्री ११.०० वाजेपर्यंत आठ तासांकरीता ( सकाळ / संध्याकाळ सत्र ) एकूण 12 कामगारांची आवश्यकता आहे.

अर्जाचा नमुना एम/पूर्व विभाग कार्यालय, दुसरा मजला, वरिष्ठ निरीक्षक अनुज्ञापन (अति.निर्मू.) यांच्या कार्यालयात कामाच्या रक्कमेच्या ०.१२ टक्के (अंदाजे रुपये 1600/-) + १८ टक्के GST ही रक्कम रोख स्वरुपात भरुन (ना परतावा) दि. 17.11.2023 ते दि 28.11.2023 पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी ( रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून ) सकाळी 10:30 ते दुपारी 01:00 वाजेपर्यंत मिळू शकेल. अर्ज सादर करण्याचा कालावधी दिनांक 17.11.2023 पासून दिनांक 28.11.2023 पर्यंत (रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून ) कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी 10.30 ते 05.30 वाजेपर्यंत असेल व शनिवार दिनांक 18.11.2023, 25.11.2023 रोजी व दिनांक 28.11.2023 रोजी दुपारी 01.00 वाजेपर्यंत असेल. नमुद केलेल्या कालावधीनंतर सादर करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

निकषानुसार पात्र असलेल्या संस्थेच्या सूचीमधून सोडत पध्दतीने निवड झालेल्या संस्थेला योजनेच्या अटी व शर्तीसापेक्ष सहाय्यक आयुक्त, **एम/पूर्व विभाग** हे कामाचे वाटप करतील. पात्र / अपात्र असलेल्या संस्थेची सूची सुचना फ़लकावर लावली जाणार नाही. सोडत पध्दतीची निकाल प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार सहाय्यक आयुक्त एम/पूर्व विभाग यांना राहतील.

**अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक 28.11.2023 रोजी दुपारी 01.00 वाजेपर्यंत असेल.**

**निविदा सोडत दिनांक 28.11.2023 रोजी दुपारी ठिक 03.00 वाजता काढण्यात येईल.**

Anil Jadhav
२६।११

**सहाय्यक आयुक्त एम/पूर्व विभाग** (प्र)
एम/पूर्व विभाग कार्यालय इमारत,
म.तु. कदम मार्ग, गोवंडी (प),
मुंबई - 4000 043.